# नविन मान्यता प्राप्त अल्पसंख्याक तंत्रनिकेतन

१२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र पुरस्कृत बहु क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) परभणी शहरातील नविन तंत्रनिकेतन इमारतीचे प्रस्तावास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाकडून MsDP अंतर्गत परभणी शहरातील नव्याने मान्यताप्राप्त तंत्रनिकेतन इमारत बांधकामासाठी केंद्र हिश्श्यातील पहिल्या टप्प्यातील एकूण रु.३६९.००/- लाख इतकी रक्कम तसेच राज्य हिश्श्यातील पहिल्या टप्प्यातील एकूण रु.२४६.००/-लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

MsDP योजनेंतर्गत परभणी शहरातील नव्याने मान्यताप्राप्त अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतन इमारत ही परभणी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात १.५५ हेक्टर जागेत सुरु करण्याचे नियोजित आहे. याकरिता सदर इमारतीचे नमूना नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागमार्फत तयार करण्यात आले आहेत. सदर इमारत बांधकामाकरिता इमारतीची जागा वापरकर्त्या विभागाच्या नावे असणे आवश्यक असल्यामुळे सदर जमीन ही उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई अथवा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर यांच्या नावे करणेकरिता शासन निर्णय होणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने संचालक (प्रशि), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडे सदर तंत्रनिकेतन इमारत बांधकामास त्वरीत सुरु करण्याचे दृष्टीने १.५५ हेक्टर जमीन हस्तांतरणाबाबत पाठविण्यात आलेला प्रस्ताव मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी व शासन निर्णय निर्गमित करण्याकरिता सादर करण्याबाबत या कार्यालयामार्फत पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

तसेच परभणी येथे सुरु करावयाचे तंत्रनिकेतन हे फक्त अल्पसंख्यांक मुलींसाठी न करता अल्पसंख्यांक मुले व मुलींकरिता सुरु केल्यास अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी कमीतकमी शुल्कामध्ये प्रवेश घेवून चांगल्या प्रकारचे तांत्रिक शिक्षण घेऊ शकतील व त्याचा फायदा अल्पसंख्याक समाजाला मोठ्या प्रमाणात मिळेल. तसेच प्रस्तावित तंत्रनिकेतन हे परभणी शहराच्या मध्यवर्ती भागात व सुसज्य इमारतीसह व परिपुर्ण साधन सामुग्री तसेच पुर्ण शिकविणारे कर्मचारी व प्राध्यापक उपलब्ध राहील्यास व औद्योगिक क्षेत्रात ज्या व्यवसायाची जास्त मागणी आहे असे व्यवसाय सुरु केल्यासच, सदरील शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यास हरकत नाही. असे झाल्यास निश्चितपणे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना तंत्रनिकेतनाचा लाभ होउन रोजगारात वाढ होईल.

त्या अनुषंगाने परभणी जिल्हा अल्पसंख्यांक बहुल आहे आणि अल्पसंख्यांक समाजातील मुला मुलींना तांत्रिक शिक्षण घेऊन रोजगाराच्या संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामूळे अल्पसंख्याक समाजातील मुलींसोबतच अल्पसंख्यांक समाजातील मुलांनादेखील प्रस्तावित शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश दिल्यास आणि परभणी जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजातील मुला मुलींकरिता औद्योगिक क्षेत्रात ज्या व्यवसायाची जास्त मागणी आहे असे व्यवसायिक शिक्षण उपलब्ध करुन दिल्यास परभणी शहरात MsDP अंतर्गत प्रस्तावित नविन शासकीय तंत्रनिकेतन सुरु करणे सयुक्तिक राहील याप्रमाणे अभिप्राय या कार्यालयामार्फत अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्यात आले आहे.

तसेच परभणी शहरातील नव्याने मान्यताप्राप्त अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतनाच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता घेण्यात आलेली असून कौशल्य विकास विभागाकडून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची जागा सदर तंत्रनिकेतन इमारतीच्या बांधकामाकरिता हस्तांतरीत करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित होताच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तंत्रनिकेतन इमारतीचे तयार करण्यात आलेले नमूना नकाशे अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे प्रशासकीय मान्यतेकरिता सादर करण्यात येतील. तसेच अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्रदान होताच परभणी शहरातील नव्याने मान्यताप्राप्त अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतनच्या इमारत बांधकास तातडीने सुरुवात करण्यात येईल.